RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक १३४(३)] शनिवार, सप्टेंबर २१, २०१९/भाद्र ३०, शके १९४१ [पृष्ठे ८०, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३७९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २० सप्टेंबर २०१९

अधिसूचना

क्रमांक अॅक्युंप-१११८/सी.आर.२८७/भाग-१/अॅक्ट.—महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर चिकित्सा पध्दती अधिनियम, २०१५ (२०१७ चा महा. २५) च्या कलम ३५ ची पोट कलमे (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन उक्त अधिनियमातील तरतुदी अंमलात आणण्यासाठी खालील नियम प्रसिध्द करीत आहेत. उक्त नियम कलम ३५ च्या पोट कलम (१) मधील तरतूदीनुसार या पुर्वी प्रसिध्द करण्यांत आलेले आहेत.

प्रकरण एक

प्रारंभिक

१. **संक्षिप्त नाव.—** या नियमास, महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषद नियम, २०१९, असे म्हणावे.

२. **व्याख्या.—**

(१) या **नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -**

(क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर चिकित्सा पध्दती अधिनियम, २०१५ (२०१७ चा महा. २५), असा आहे;

(ख) "नमुना" याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना, असा आहे;

(ग) "कलम" याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे.

(२) या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अधिनियमात त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

प्रकरण दोन

परिषदेची निवडणूक घेणे

३. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची नियुक्ती :-

(१) कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क) अन्वये परिषदेच्या सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी, राज्य शासन, राज्य शासनाच्या अवर सचिव यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करील :

परंतु कोणत्याही कारणास्तव, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त केलेला अधिकारी हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत शासनाने प्राधिकृत केलेली इतर कोणतीही व्यक्ती किंवा प्रबंधक हा, निवडणूक निर्णय अधिकारी असेल. शासनाने, निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त केला असेल त्याबाबतीत प्रबंधक हा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करील.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणुकीच्या कामासाठी त्याला सहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेला कर्मचारीवर्ग यांना, परिषद, वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे अतिरिक्त मोबदला देण्यात येईल.

४. परिषदेच्या निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करणे व त्या प्रसिध्द करणे :-

(१) अधिनियमाचे कलम ३ याच्या पोट-कलम (३) च्या खंड (क) अन्वये निवडून द्यावयाच्या परिषदेच्या पाच सदस्यापैकी, तीन सदस्य हे, नोंदवहीच्या भाग-क मध्ये नोंदणी केलेल्या ॲक्यूपंक्चर व्यवसायींकडून निवडून देण्यात येतील आणि दोन सदस्य हे, नोंदवहीच्या भाग-ख अन्वये नोंदणी केलेल्या ॲक्यूपंक्चर व्यवसायींकडून निवडून देण्यात येतील. प्रबंधक, परिषदेने ठेवलेल्या नोंदवहीच्या भाग-क व भाग ख मध्ये नोंदणी केलेल्या ॲक्यूपंक्चर व्यवसायींची स्वतंत्र मतदार यादी तयार करील.

(२) प्रत्येक निवडणूकीसाठी परिषदेकडून निश्चित करण्यात येईल अशा दिनांकापर्यंत नोंदणी केलेल्या सर्व ॲक्यूपंक्चर व्यवसायींची नावे मतदार यादी मध्ये, समाविष्ट करण्यात येतील. हा दिनांक आणि उप-नियम (१) अन्वये मतमोजणीसाठी निश्चित केलेला दिनांक, या दरम्यानचा कालावधी तीन महिन्यांहून अधिक असणार नाही. नोंदवहीच्या भाग-क किंवा भाग-ख मधील पात्र मतदार, नोंदवहीच्या त्या त्या भागातील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांकरिता मतदान करण्यास पात्र असतील.

(३) प्रबंधक, नामनिर्देशनपत्रे प्राप्त होण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या किमान तीस दिवसां अगोदर, नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायींच्या मतदार याद्यांच्या प्रती, परिषदेच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावून प्रदर्शित करील. मतदार यादीच्या प्रती, परिषदेकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल. अशा किंमतीत परिषदेच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येतील. प्रबंधक त्याचवेळी, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** आणि त्याने निवडलेल्या व महाराष्ट्र राज्यात प्रसिध्द होणाऱ्या किमान चार वृत्तपत्रांमध्ये, नमुना एक मधील नोटीस प्रसिध्द करील, आणि त्या नोटीशीद्वारे, मतदार याद्यांमधील नोंदीच्या संबंधात ती नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आतील नसेल अशा, त्या नोटीशींमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायींकडून त्यांच्या हरकती किंवा सूचना, कोणत्याही असल्यास मागवील. त्या नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व हरकती किंवा सूचना प्रबंधकाकडून विचारात घेण्यात येतील आणि आवश्यक असल्यास मतदारयाद्यांमध्ये दुरूस्त्या करण्यात येतील.

(४) जर कोणत्याही मतदारयादीमध्ये सुधारणा करण्यात आल्या असतील तर, सुधारणांसह अशी यादी अधिनियमान्वये निवडणुकीच्या प्रयोजनासाठीची मतदार यादी असेल. ही मतदार यादी देखील परिषदेच्या सूचना फलकावर लावण्यात येईल. मतदार यादीत कोणत्याही सुधारणा केलेल्या असल्यास त्या सुधारणांच्या प्रती, परिषदेने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने परिषदेच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

५. निवडणुकीचे टप्पे निश्चित करणे :-

(१) **निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीचे पुढील टप्पे निश्चित करील :-**

(क) नामनिर्देशनपत्रे ज्या दिवशी, ज्या ठिकाणी व ज्या मुदतीत सादर करावयाची तो दिवस, ते ठिकाण आणि ती मुदत;

(ख) नामनिर्देशनपत्रांची ज्या दिवशी, ज्या ठिकाणी आणि ज्या मुदतीत छाननी करावयाची तो दिवस, ते ठिकाण आणि ती मुदत;

(ग) नामनिर्देशन ज्या दिवशी, ज्या ठिकाणी आणि ज्या मुदतीत मागे घेता येईल तो दिवस, ते ठिकाण आणि ती मुदत;

(घ) मतपत्रिका ज्या दिवशी, ज्या ठिकाणी आणि ज्या मुदतीत पाठवण्यात येतील व प्राप्त होतील तो दिवस, ते ठिकाण आणि ती मुदत; आणि

(ङ) ज्या दिवशी, ज्या ठिकाणी आणि ज्या मुदतीत मतमोजणी करण्यात येईल तो दिवस, ते ठिकाण आणि ती मुदत.

(२) नामनिर्देशनपत्रे प्राप्त होण्याचा दिनांक हा, मतपत्रिका प्राप्त होण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या चाळीस दिवसांच्या अगोदरचा असणार नाही. नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी निश्चित केलेला दिनांक हा नामनिर्देशनपत्रे प्राप्त होण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या पुढील दिवस असेल.

६. निवडणुकीची नोटीस :-

नामनिर्देशनपत्रे प्राप्त होण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या किमान तीस दिवस अगोदर निवडणूक निर्णय अधिकारी, नियम ५ च्या उप-नियम (१) अन्वये निश्चित केलेले दिनांक अधिसूचित करणारी आणि मतदारांना नवीन सदस्य निवडण्याचे आणि त्या प्रयोजनांसाठी नामनिर्देशने पाठविण्याचे आवाहन करणारी नोटीस नमुना दोन मध्ये, एकाचवेळी **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** तसेच त्याने निवडलेल्या, महाराष्ट्रातील विस्तृत खप असणाऱ्या किमान चार वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करील. या नोटीशीची एक प्रत परिषदेच्या कार्यालयातील सूचना फलकावर देखील प्रदर्शित करण्यात येईल.

७. नामनिर्देशनपत्रे सादर करणे :-

(१) नियम ४ अन्वये तयार केलेल्या कोणत्याही मतदारयादीत ज्याचे नाव दाखल असेल असा प्रत्येक नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायी (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश "मतदार" असा केलेला आहे), कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये त्याला निरर्ह ठरविले नसेल तर, ज्या मतदारसंघाशी मतदार यादी संबंधित असेल त्या मतदार संघासाठीच्या निवडणुकीकरीता अर्ह असेल.

(२) संबंधित भागाअंतर्गत मतदार म्हणून अर्ह ठरलेला नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायी हा निवडणुकीसाठी अर्ह ठरलेल्या उमेदवारांचे नाव सूचवील आणि त्यास अनुमोदन देईल. नामनिर्देशन नमुना अहस्तांतरणीय आहे.

(३) प्रत्येक वैध नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायीने परिषदेकडून पुरविण्यात आलेले ओळखपत्र दाखविल्यावर त्याच्या मागणीवरून त्याला नमुना तीन मधील नामनिर्देशन पत्र प्रबंधकाकडून पुरविण्यात येईल.

(४) यथोचितरीत्या पूर्णपणे भरलेले व सूचक व अनुमोदकाने स्वाक्षरी केलेले, आणि नामनिर्देशनास अनुमती म्हणून स्वतः उमेदवाराने सही केलेले नमुना तीन मधील प्रत्येक नामनिर्देशनपत्र, ते जमा करण्यासाठी, नियम ५ च्या उप-नियम (१) च्या खंड (क) अन्वये नेमून दिलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी व मुदतीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पोहोचेल अशारीतीने डाकद्वारा किंवा अन्यरीतीने पाठवील. अशाप्रकारे निश्चित केलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणारी नामनिर्देशनपत्रे नाकारण्यात येतील. प्रत्येक नामनिर्देशनपत्र प्राप्त झाल्यानंतर लगेच निवडणूक निर्णय अधिकारी, त्याला ज्या दिनांकास व ज्या वेळी नामनिर्देशनपत्र प्राप्त झाले असेल तो दिनांक व ती वेळ पृष्ठांकित करील आणि तसेच, ते नामनिर्देशनपत्र प्राप्त झाल्याची देखील तात्काळ पोच देईल:

परंतु कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्याच्यावतीने एकाहून अधिक नामनिर्देशनपत्र सादर करण्यात येणार नाही, किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून ते स्वीकारण्यात येणार नाही.

(५) प्रत्येक उमेदवार, नामनिर्देशनपत्रासह, परिषदेच्या प्रबंधकाच्या नावे अनामत रक्कम म्हणून पाच हजार रूपये इतक्या रकमेचा दर्शनी धनाकर्ष निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे जमा करील. अशी अनामत रक्कम न जोडलेले नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकारी विचारात घेणार नाही. ती अनामत रक्कम उप-नियम (६) अन्वये परिषदेकडे जप्त केली नसेल तर, निवडणूकीचा निकाल घोषित झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर उमेदवाराला परत करण्यात येईल.

(६) जर उमेदवार निवडून आला नसेल आणि संबंधित प्रवर्गातून निवडावयाच्या सदस्यांच्या एकूण संख्येने भागले असता, त्याच्या बाजूने नोंदविलेली वैध मतांची संख्या ही, नोंदविलेल्या एकूण मतसंख्येच्या एक-अष्टमांश पेक्षा कमी असेल तर, ती अनामत रक्कम परिषदेकडे जप्त करण्यात येईल.

८. नामनिर्देशनपत्रांची छाननी :-

नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नियत केलेल्या दिनांकास उमेदवार आणि प्रत्येक उमेदवाराचा सूचक व अनुमोदक नियत वेळी व ठिकाणी उपस्थित राहतील आणि निवडणूक निर्णय अधिकारी, उपरोक्त प्रमाणे त्याला प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी करण्यासाठी, निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना आणि त्यांच्या सूचकांना सर्व वाजवी सुविधा पुरवील. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सूचकाने व अनुमोदकाने परिषदेचे वैध ओळखपत्र दाखवणे अनिवार्य असेल.

९. आक्षेप निकाली काढणे व नामनिर्देशन रद्द करणे :-

निवडणूक निर्णय अधिकारी, त्यास प्राप्त झालेल्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी करील आणि आक्षेपांवर निर्णय घेईल आणि त्यास, एकतर अशा आक्षेपाबाबत किंवा त्याच्या स्वाधिकारे त्याला आवश्यक वाटेल अशी संक्षिप्त चौकशी, कोणतीही असल्यास, केल्यानंतर पुढील कोणत्याही कारणावरून कोणतेही नामनिर्देशनपत्र नाकारता येईल. ती कारणे म्हणजे :-

(क) उमेदवार किंवा त्याचा सूचक किंवा अनुमोदक मतदार नसणे;

(ख) अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन केलेले नसणे;

(ग) उमेदवार किंवा त्याचा सूचक किंवा त्याचा अनुमोदक यांच्या सहीची, परिषदेच्या अभिलेखावरील नमुना स्वाक्षरीशी पडताळणी केली असता ती जुळून न येणे किंवा ती स्वाक्षरी लबाडीने प्राप्त केलेली असणे;

१०. छाननी पूर्ण करणे :-

(१) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनावरील त्याचा निर्णयाबाबत मग ते नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात आलेले किंवा नाकारण्यात आलेले असो, पृष्ठांकित करील आणि जर ते नामनिर्देशनपत्र नाकारण्यात आले असेल तर, तो असे नामनिर्देशन नाकारण्याबद्दलच्या त्याच्या कारणांबाबतचे लेखी स्वरूपातील संक्षिप्त कथन नमूद करील.

(२) सदर छाननी, त्यासाठी नियत केलेल्या दिवशी पूर्ण करण्यात येईल आणि कार्यवाहीस कोणतीही स्थगिती दिली जाणार नाही.

११. उमेदवारी मागे घेणे :-

(१) कोणत्याही उमेदवारास नियम १० अन्वये नामनिर्देशन पत्राची छाननी केल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत त्याने स्वाक्षरी केलेली लेखी नोटीस, त्याने व्यक्तीशः किंवा उमेदवाराने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या सूचकामार्फत किंवा अनुमोदकामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला एकतर सुपूर्द करून नियम ५ च्या उप-नियम (१) च्या खंड (ग) अन्वये नियत केलेल्या दिनांकापूर्वी आपली उमेदवारी मागे घेता येईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवारी मागे घेण्याबाबतच्या नोटीशीच्या खरेपणाबाबत आणि उप-नियम (१) खाली ती सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीबाबत त्यांची खात्री पटल्यावर, त्याच्या कार्यालयातील काही ठळक ठिकाणी ती नोटीस लावील.

(३) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने एकदा मंजूर केलेली, उमेदवारी मागे घेण्याबाबतची नोटीस ही, अंतिम असेल.

१२. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची सूची :-

निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशनपत्रांची छाणनी केल्यावर आणि नियम ११ अन्वये ज्या कालावधीत उमेदवारी मागे घेता येईल तो कालावधी समाप्त झाल्यानंतर, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची एक सूची, आपल्या स्वाक्षरीने, परिषदेच्या कार्यालयातील सूचना फलकावर तात्काळ प्रदर्शित करील.

१३. बिनविरोध निवडणूकीची कार्यपध्दती :-

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी सूची प्रसिध्द केल्यानंतर, जर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या भरावयाच्या रिक्त जागांच्या अधिक नसेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी , अशा जागा भरण्यासाठी यथोचितरीत्या निवडून आले असल्याचे अशा उमेदवारांना तात्काळ घोषित करील आणि अशा उमेदवारांची नावे शासनाला कळवील.

१४. लढविलेली निवडणूक :-

(१) जेव्हा रिक्त जागांपेक्षा उमेदवार अधिक असतील तर, डाक मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्यात येईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे आणि पत्ते, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** तात्काळ प्रसिध्द करील आणि ती परिषदेच्या कार्यालयातील फलकावर प्रदर्शित करील.

१५. मतपत्रिका छापणे :-

निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे इंग्रजी लिपीनुसार वर्णक्रमे नमूद करून नमुना चार मधील मतपत्रिका छापण्याची व्यवस्था करील.

१६. मतदारांना मतपत्रिका पाठविणे :-

(१) नियम ५ च्या उपनियम (१) च्या खंड (घ) अन्वये मतपत्रिका प्राप्त करण्यासाठी नियत केलेल्या दिनांकाच्या एकवीस दिवस अगोदर, निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक मतदाराला शासकीय शिघ्र डाकेने पुढील बाबी पाठवील.

(क) त्याने स्वाक्षरी केलेली नमुना चार मधील एक मतपत्रिका;

(ख) "मतपत्रिका" असा मजकूर मुद्रित केलेल्या लहान आकारातील एक रिकामा लिफाफा; आणि

(ग) नमुना पाच मधील त्याच्या स्वत:चा पत्ता असलेले योग्य त्या मोठया आकारातील एक मोठा लिफाफा;

(२) निवडणूक निर्णय अधिकारी, मतदार यादीच्या एका प्रतीमध्ये ज्यांना ज्यांना मतपत्रिका व पाकीटे पाठविण्यात आले असतील अशा प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर चिन्हांकित करील. मतदार यादीची ती चिन्हांकित प्रत, आणि मतपत्रिकेची प्रतिपत्रे हे, नियम ५ च्या उपनियम (१) च्या खंड (घ) अन्वये मतपत्रिका मिळण्यासाठी नियत केलेल्या दिनांकाच्या नंतर लगेचच एका पाकिटात मोहोरबंद करण्यात येईल.

१७. मतपत्रिकेची दुबार प्रत देणे :-

जर एखाद्या मतदाराला त्याची मतपत्रिका व लिफाफा प्राप्त झाला नसेल, किंवा अनवधानाने मतपत्रिका खराब झाली असेल किंवा ती गहाळ झाली असेल तर, नियम ५ च्या उपनियम (१) च्या खंड (घ) अन्व्ये मतपत्रिका प्राप्त करण्यासाठी नियत केलेल्या दिनांकाच्या किमान सात दिवस अगोदर त्यास, आपल्या स्वाक्षरीने तशा आशयाचे प्रतिज्ञापन अणि ती खराब मतपत्रिका कोणतीही असल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे परत पाठविता येईल आणि प्राप्त न झालेल्या, खराब झालेल्या किंवा हरविलेल्या मतपत्रिकेच्या जागी, दुबार मतपत्रिका पाठविण्याची निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास विनंती करता येईल. मतपत्रिकेची दुबार प्रत निर्गमित करण्यात आली असेल तेव्हा, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे, त्याबाबतचा अभिलेख ठेवण्यात आला असेल आणि ती निर्गमित करण्यापूर्वी मोठ्या पाकीटावर तसेच मतपत्रिकेवर "दुबार प्रत" असे चिन्हांकित करण्यात येईल. निवडणुक निर्णय अधिकारी त्याला मतदाराकडून परत प्राप्त झालेली खराब मतपत्रीका रद्द करेल.

१८. मतदारांना मतपत्रिका व्यक्तिशः सुपूर्द करणे :-

सुपूर्द न केलेली ज्या कोणत्याही मतदाराची मतपत्रिका परत आली असेल अशा कोणत्याही उमेदवारास, नियम ५ च्या उपनियम (१) खंड (घ) अन्वये मतत्रिका प्राप्त करण्यासाठी नियत केलेल्या दिनांकापूर्वी अशी मतपत्रिका मिळण्यासाठी व्यक्तीशः निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल, आणि त्यास, त्याच्या ओळखीबाबत निवडणूक अधिकाऱ्याची खात्री पटवून दिल्यानंतर व त्याबद्दलची पावती दिल्यावर मतपत्रिका प्राप्त करता येईल.

१९. मतदाराने मत नोंदविणे :-

(१) मतपत्रिका प्राप्त झाल्यावर, मतदार, ज्या उमेदवारास तो आपले, मत देऊ इच्छित असेल तो, मतपत्रिकेतील त्या उमेदवाराच्या नावासमोरील स्तंभ ३ मध्ये × अशी फुली, उमटवून मतदान नोंदवील. जेवढ्या रिक्त जागा असतील तेवढी मते, मतदाराला असतील आणि तो, प्रत्येक उमेदवारास केवळ एकच मत देऊ शकेल. उमेदवार, मतपत्रिकेवर आपली स्वाक्षरी करुन, किंवा कोणत्याही अन्य प्रकारे, आपली ओळख उघड करणार नाही.

(२) मतदार, मत नोंदविल्यानंतर ती मतपत्रिका लहान लिफाफ्यात ठेवील, तो लिफाफा बंद करुन तो लहान लिफाफा, मोठ्या लिफाफ्यात ठेवील. मतदार, नंतर तो मोठा लिफाफा बंद करील आणि त्या मोठ्या लिफाफ्यावर चिन्हांकित केलेल्या जागी आपले संपूर्ण नाव लिहून स्वाक्षरी करील. मतपत्रिका प्राप्त करण्यासाठीच्या नियम ५ च्या उपनियम (१) च्या खंड (घ) अन्वये नियत केलेल्या दिनांकास, किंवा त्यापूर्वी व त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पोहोचेल अशा बेताने तो मोठा लिफाफा डाकद्वारा पाठविण्यात येईल.

(३) वरील रीतीने त्याला आपले मत नोंदविण्यास असमर्थ करील अशी कोण्तीही दिव्यांगता असणाऱ्या कोणत्याही मतदारास, आपले मत नोंदविण्यासाठी राजपत्रित अधिकाऱ्याची किंवा दंडाधिकाऱ्याची मदत घेता येईल.असा अधिकारी, अशा प्रकरणी मोठ्या लिफाफ्याच्या मागील भागावर पुढील आशयाचे प्रमाणपत्र लिहील :-

"मी, ...(अधिकाऱ्याचे नाव) याद्वारे, असे प्रमाणित करतो की, श्री. ..... (मतदाराचे नाव) हे (अक्षमतेचे कारण) या कारणामुळे आपले मत नोंदविण्यास अक्षम असल्यामुळे त्यांचे मत नोंदविण्याची त्यांनी मला विनंती केली होती, आणि मी त्यांच्या इच्छेनुसार व त्यांच्या समक्ष त्यांचे मत नोंदविले आहे."

स्वाक्षरी .....

पदनाम .....

दिनांक ..... वेळ ..... मोहोर .....

२०. मतपत्रिकांची अभिरक्षा :-

मतपत्रिका अंतर्भूत असलेले सर्व लिफाफे प्राप्त झाल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक लिफाफ्यावर ते प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद केल्यानंतर, मोहोरबंद पेटीत ठेवील. नियम ५ च्या उपनियम (१) च्या खंड (घ) अन्वये मतपत्रिका प्राप्त करण्यासाठी नियत केलेल्या दिनांकाच्या व वेळेच्या नंतर प्राप्त झालेला कोणताही लिफाफा, एका स्वतंत्र पाकिटात ठेवण्यात येईल आणि तो, उघडण्यात येणार नाही.

२१. मतांची छाननी व मतमोजणी करणे :-

(१) निवडणूक निर्णय अधिकारी नियम ५ च्या उपनियम (१) च्या खंड (ङ) अन्वये नियत केलेल्या वेळी, दिवशी व व ठिकाणी मतांची छाननी व मोजणी हाती घेईल.

(२) उमेदवारास किंवा त्याने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या केवळ एका प्रतिनिधीस, मतमोजणीच्या वेळी उपस्थित राहता येईल.

(३) संपूर्ण मतपत्रिका हया, पुढील कारणांवरून अवैध समजण्यात येतील, ती कारणे म्हणजे, -

(क) ज्या मोठ्या लिफाफ्यात मतपत्रिका असलेला लहान लिफाफा ठेवण्यात आला असेल त्या मोठया लिफाफ्यावर उमेदवाराने आपले संपूर्ण नाव लिहिलेले असणे आणि स्वाक्षरी केलेली नसणे;

(ख) मतदाराने केलेली स्वाक्षरी ही, परिषदेच्या अभिलेखातील त्याच्या नमुना स्वाक्षरीशी जुळलेली नसणे;

(ग) भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक संख्येतील उमेदवारांच्या नावापुढे "(×)" अशी खूण केलेली असणे किंवा नियम १९ च्या उपनियम (१) अन्वये मत देण्यास हक्कदार असलेल्या मतांपेक्षा उमेदवाराने अधिक मते दिलेली असणे;

(घ) मतदाराने मतपत्रिकेवरील आपली स्वाक्षरी केलेली असणे किंवा ज्यामुळे त्याची ओळख उघड होईल अशी कोणतीही खूण मतपत्रिकेवर केलेली असणे;

(४) जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला, एका लहान लिफाफ्यातून एकापेक्षा अधिक मतपत्रिका, किंवा, कोणत्याही मोठ्या लिफाफ्यातून एकापेक्षा अधिक लहान लिफाफे प्राप्त झाले असतील तर, अशा सर्व मतपत्रिका ह्या अवैध असल्याचे मानण्यात येईल.

(५) मतदाराने '(×)' ही खूण अशा जागी उमटविलेली असेल की त्याने नेमके कोणत्या उमेदवाराला त्याचे मत दिले आहे, याबाबत शंका निर्माण होईल तर, ते, मत अवैध असल्याचे मानण्यात येईल; आणि सदर मतपत्रिका अवैध समजण्यात येईल.

(६) एखाद्या मतदाराने कोणत्याही उमेदवाराला एकापेक्षा अधिक मते दिली असतील तर, दिलेल्या अशा मतांपैकी केवळ एकच मत वैध समजण्यात येईल; मात्र अशी मतपत्रिका ही इतर बाबतीत अवैध असता कामा नये.

२२. निवडणुकीचा निकाल घोषित करणे :-

(१) मतमोजणी पूर्ण झाली असेल तेव्हा, निवडणूक निर्णय अधिकारी, ज्या उमेदवाराला सर्वात अधिक वैध मते देण्यात आली असतील असा उमेदवार निवडून आला असल्याचे तात्काळ घोषित करील. जर एकाच रिक्त पदासाठी दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांना समसमान मते मिळालेली असतील तर, निवडणूक निर्णय अधिकारी, त्या निवडीबाबत चिठ्ठ्या टाकून निर्णय करील.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक यशस्वी उमेदवाराला, तो परिषदेवर निवडून आला असल्याचे पत्राद्वारे देखील कळवील.

(३) निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी मतपत्रिका व निवडणूकीशी संबंधित सर्व दस्तऐवज मोहोरबंद करील, आणि ते, सहा महिन्यांच्या कालावधीसाठी त्याच्याकडे सुरक्षित ठेवील, आणि त्यानंतर शासनाची पूर्व मान्यता घेतल्यानंतर, ते नष्ट करण्याची व्यवस्था करील.

२३. निवडणूकीचा निकाल शासनास कळविणे :-

निवडणूक निर्णय अधिकारी कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, निवडून आलेल्या उमेदवारांची नावे महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिध्द करण्यासाठी, त्यांची नावे शासनाला कळवील.

२४. नैमित्तिक रिक्त पद भरणे :-

कलम ३ च्या पोट कलम (३) च्या खंड (क) अन्वये निवडून आलेल्या सदस्याचे पद नैमित्तिकरीत्या रिक्त झाल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी, कलम ५ च्या पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या अधीन राहून, नियम ५ ते २३ यांच्या तरतुदी अनुसार शक्य तितक्या लवकर ते रिक्त पद निवडणुकीद्वारे भरण्यासाठी उपाययोजना करील.

२५. निवडणूक विषयीचा विवाद निर्देशित करण्यासाठीची कालमर्यादा :-

राज्य शासनाकडे कोणताही वादी निर्देशित करण्यासाठीची कालमर्यादा,

(एक) निवडून आलेल्या सदस्यांच्या बाबतीत, निवडणुकीचे निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीस दिवस एवढी असेल; आणि

(दोन) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीच्या बाबतीत, त्यांच्या निवडणूकीच्या दिनांकापासून तीस दिवसाएवढी असेल.

प्रकरण तीन

परिषदेचे कामकाज चालविणे

२६. बैठका बोलविणे :-

(१) परिषद कामकाज चालविण्यासाठी सर्वसाधारणपणे वर्षातून दोनदा तिची बैठक घेईल, परंतु अध्यक्षास त्याला योग्य वाटेल तेव्हा-तेव्हा, आणि सात पेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या लेखी मागणीवरुन आणि अशी मागणी प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत, कोणत्याही दिनांकास एक विशेष बैठक बोलावता येईल.

(२) अशा बैठकींचा नेमका दिनांक, वेळ व ठिकाण अध्यक्षांकडून ठरविण्यात येईल.

२७. बैठक बोलविण्याबाबतची नोटीस :-

(१) परिषदेच्या सर्व सदस्यांना, सर्वसाधारण बैठकीची नोटीस पूर्ण पंधरा दिवस अगोदर आणि विशेष बैठकीची नोटीस पूर्ण सात दिवस अगोदर देण्यात येईल. प्रत्येक नोटीस परिषदेच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात येईल तसेच तिच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल. अशा नोटिशीत, बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण विनिर्दिष्ट करण्यात येईल आणि त्यात बैठक सर्वसाधारण कामकाजासाठी आहे किंवा कोणत्याही विशेष कामकाजासाठी आहे, हे नमूद केलेले असेल. बैठक विशेष कामकाजासाठी घेण्यात येणार असेल तर, अशा कामकाजाचे स्वरूप देखील त्या नोटिशीमध्ये नमूद करण्यात येईल.

(२) प्रबंधक, सर्व सदस्यांना कार्यसूची आणि त्यावरील स्पष्टीकरणात्मक टिप्पण्या यांची एक प्रत, सर्वसाधारण बैठकीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या पूर्व पंधरा दिवस अगोदर पाठवील आणि विशेष बैठकीसाठी, असा कालावधी हा पूर्ण सात दिवस इतका असेल. नोटीस बजावण्याची रीत ही, शीघ्र डाक, इ-मेल आणि / किंवा इ-दळणवळण यांसारख्या, वेळोवेळी उपलब्ध असतील अशा कोणत्याही स्वीकार्य अशा आधुनिक दळणवळणाच्या साधनांद्वारे बजावण्यात येईल.

२८. कार्यसूचीत समाविष्ट करावयाचे प्रस्ताव :-

कोणत्याही सदस्यास, सर्वसाधारण बैठकीच्या कार्यसूचीमध्ये समाविष्ट करण्यास त्या बैठकीकरीता निश्चित केलेल्या दिनांकाच्या पूर्ण वीस दिवस अगोदर प्रबंधकाकडे पोहोचेल अशा रीतीने कोणताही प्रस्ताव पाठविता येईल. प्रबंधक, कार्यसूचीत अशा प्रस्तावाचा समावेश करण्यासाठी अध्यक्षांचे आदेश घेईल, आणि असा कोणताही प्रस्ताव नामंजूर केला गेल्यास, तसे करण्याबाबतची कारणे, ज्याने प्रस्ताव पाठविला आहे अशा सदस्याला कार्यसूचीसह कळविण्यात येतील.

२९. बैठकींतील उपस्थिती :-

प्रत्येक बैठकीच्या प्रारंभी, बैठक कक्षात एक उपस्थिती नोंदवही ठेवण्यात येईल आणि तेथे उपस्थित असलेला प्रत्येक सदस्य त्या नोंदवहीत आपआपल्या नावासमोर स्वाक्षरी करील.

३०. बैठकीत करावयाचे कामकाज :-

सर्वसाधारण बैठकीमध्ये कार्यसूचीत आणि विशेष बैठक असल्यास, त्या बैठकीत अशी बैठक बोलाविण्यासाठी लेखी मागणी करून विनिर्दिष्ट करण्यात आलेले कामकाज किंवा प्रस्ताव यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कामकाजावर किंवा प्रस्तावावर चर्चा केली नाही.

परंतु, पीठासीन अधिकाऱ्यास जे तात्काळ स्वरुपाचे असेल आणि ते नोटिशीमध्ये वाजवीपणे समाविष्ट करता येऊ शकले नसेल अशा कोणत्याही कामकाजावर किंवा प्रस्तावावर चर्चा करण्याची अनुमती देता येईल.

३१. बैठक तहकूब करणे :-

(१) कलम ९ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, पीठासीन प्राधिकाऱ्यास, त्यावेळी परिषदेच्या पाच सदस्यांच्या गणपूर्तीच्या अभावी, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करुन, पुढील कोणत्याही दिवसापर्यंत किंवा त्याच दिवसाच्या पुढील कोणत्याही वेळे पर्यंत बैठक तहकूब करता येईल:

परंतु, गणपूर्तीच्या अभावी तहकूब करण्यात आलेली बैठक, एका तासानंतर सुरु करता येऊ शकेल आणि अशा प्रकारे सुरु केलेल्या त्या बैठकीसाठी कोणत्याही गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

(२) बैठक पुढील दिवसापर्यंत तहकूब करण्यात आली असेल तेव्हा, अध्यक्षास, असा दिवस इतर कोणत्याही दिवसात बदलता येईल, आणि, अशा बदलाबाबतची परिषदेच्या प्रत्येक सदस्याला लेखी नोटीस पाठविल :

परंतु, अशी कोणतीही तहकूब केलेली बैठक, सदस्यांना पूर्ण पंधरा दिवसांची नोटीस देण्यात आल्याखेरीज, घेण्यात येणार नाही.

(३) मूळ बैठक तहकूब केल्यामुळे निकालात काढावयाचे राहून गेलेले तिचे, कामकाज, त्या तहकुबीनंतर सुरु झालेल्या बैठकीत अध्यक्षाने अन्यथा निर्देश दिले नसतील तर नवीन कामकाजाच्या आधी निकालात काढण्यात येईल.

३२. बैठकींची कार्यवृत्ते :-

(१) परिषदेच्या प्रत्येक बैठकीच्या कार्यवाहीची कार्यवृत्ते, त्या प्रयोजनार्थ तरतूद केलेल्या नोंदवहीमध्ये नोंदवण्यात येतील आणि त्यामध्ये, सदस्यांच्या नावांचा समावेश असेल आणि बैठकीत उपस्थित असलेल्या कोणत्याही सदस्याची तशी इच्छा असल्यास अनुक्रमे कोणत्याही प्रस्तावाच्या बाजून किंवा त्याविरुध्द मतदान करणाऱ्या सदस्यांची नावे समाविष्ट करण्यात येतील.

(२) परिषदेच्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर अध्यक्ष स्वाक्षरी करील ; त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष, आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोघांच्याही अनुपस्थितीत, पीठासीन प्राधिकारी स्वाक्षरी करील.

(३) अध्यक्ष कार्यवृत्तांना पुष्टी दिल्यानंतर, पुढील बैठकीमध्ये या नोंदवहीवर स्वाक्षरी करील, आणि ती, सर्व वाजवी वेळी, परिषदेच्या कोणत्याही सदस्याला निरीक्षण करु देण्यासाठी खुली राहील.

(४) त्या कार्यवृत्तांच्या प्रती बैठकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत परिषदेच्या प्रत्येक सदस्याला पुरविण्यात येतील.

(५) बैठक, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा म्हणजे व्हिडीओ दूरसंपर्क माध्यम (कॉन्फरन्सींग), इत्यादींचा वापर करुन आयोजित करण्यात येईल.

३३. लेखी प्रस्ताव प्रसृत करणे :-

बैठक बोलाविणे अनावश्यक आहे असे अध्यक्षाला जेव्हा-जेव्हा दिसून येईल तेव्हा-तेव्हा त्यास, ती बैठक बोलाविण्याऐवजी परिषदेच्या सदस्यांच्या निरीक्षणाकरीता व त्याच्या मतांकरीता लेखी प्रस्ताव, त्या बदलण्याच्या कारणांसह, पाठविता येईल आणि नंतर त्याबाबतीत नियम ३२ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांस लागू होतील,

३४. बैठकीस उपस्थित राहण्याबाबतची फी :-

परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह प्रत्येक सदस्याला, परिषदेच्या किंवा तिच्या कोणत्याही समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन दोन हजार रुपये इतकी फी प्रदान करण्यात येईल.

३५. बैठकीस उपस्थित राहण्याकरीता प्रवास भत्ता :-

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह परिषदेच्या प्रत्येक सदस्याला, परिषदेच्या किंवा तिच्या कोणत्याही समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी, त्यांच्या निवासस्थानापासून ते परिषदेच्या कार्यालयापर्यंतच्या सर्वात जवळच्या अंतरासाठी प्रति किलोमीटर पंधरा रुपये दराने किंवा भारतीय रेल्वेच्या वातानुकूलित टू टियर वर्गाच्या (द्विस्तरीय शयनिका वर्गाच्या) भाड्या इतक्या दराने प्रवास खर्च प्रदान करण्यात येईल.

प्रकरण चार

समितीचे अधिकार व कर्तव्ये व कार्ये आणि तिच्या बैठका

३६. कार्यकारी समितीचे अधिकार, कर्तव्ये व कार्ये :-

(१) पदव्या आणि पदविका यांना मान्यता देण्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावाची परिषदेने कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये गठीत केलेल्या कार्यकारी समितीकडून पडताळणी करण्यात येईल आणि त्याबाबतचा तपशीलवार अहवाल परिषदेपुढे तिच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

(२) समितीस गुणपत्रिकांच्या नमुन्यांची आणि ॲक्यूपंक्चर व्यवसायी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आलेल्या विश्लेषणाबाबत अशा गुणपत्रिकांवर मुद्रित व प्रदर्शित करावयाच्या अनिवार्य टिप्पणीची शिफारस करता येईल आणि नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यावसायिच्या व्यावसायिक वर्तणुकीचे नियमन करण्यासाठी एकरुपता राखण्याच्या आणि नीति तत्त्वांचे या संदर्भात आवश्यक वाटतील असे निर्देश देता येतील.

३७. अध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये :

अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, आणि या नियमांमध्ये अन्यथा तरतूदी केली असेल त्याव्यतिरिक्त अध्यक्षांचे सर्व अधिकार, कर्तव्ये व कार्ये ही अध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षकाकडून वापरण्यात येतील व पार पाडण्यात येतील.

प्रकरण पाच

प्रबंधकाच्या व इतर कर्मचारी वर्गाच्या सेवाशर्ती आणि प्रबधंकाचे पर्यवेक्षी अधिकार व त्याची कर्तव्ये

३८. प्रबंधकाची नियुक्ती, वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती :-

परिषदेस पुढील शर्तींना अधीन राहून, प्रबंधकाची नियुक्ती करता येईल, म्हणजे,-

(१) प्रबंधकाचे पद हे स्थायी असेल. प्रबंधक हा परिषदेचा पूर्ण कालिक अधिकारी असेल आणि परिषदेची परवानगी असल्याखेरीज, तो इतर कोणतेही काम करणार नाही. प्रबंधकाच्या निर्बाध रिक्त पदावर प्रथम नियुक्ती केलेली असेल अशी कोणतीही व्यक्ती, दोन वर्षाच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन असेल.

(२) प्रबंधक **पदावरील नियुक्तीकरीता पात्र होण्यासाठी उमेदवाराने—**

(एक) कायद्याद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठाची पदवी धारण केलेली असावी;

(दोन) त्यास विद्यापीठाच्या व्यवस्थापन क्षेत्रातील किंवा परिषदेच्या कामकाजाचा पाच वर्षांचा अनुभव असावा;

परंतु, परिषदेस तिने निर्धारित केला असेल अशा पदावधीसाठी प्रबंधकाच्या पदावर कोणत्याही सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल; आणि

(तीन) मराठी विषयासह माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

(३) प्रबधंकास राज्य शासनाच्या समतुल्य वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्याला जो दर अनुज्ञेय असेल त्या दराने रु.९३००-३४८०० अधीक ग्रेड वेतन रु ४४०० या वेतनश्रेणीतील वेतन, महागाई भत्ता, प्रवास भत्ता, शहर पूरक भत्ता, घरभाडे भत्ता अनुज्ञेय राहील.

(४) प्रबंधकाच्या पदावर नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या सेवा प्रवेशासाठीची वयोमर्यादा ही, राज्य समतुल्य पदधारण करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत लागू असलेल्या वयोमर्यादेइतकी, असेल.

(५) प्रबंधकाचे सेवा निवृत्तीचे वय हे, राज्य शासनाच्या बाबतीत लागू असलेल्या कर्मचाऱ्याच्या वयाइतकेच असेल.

३९. निवड पध्दती :-

(१) परिषद, प्रबंधकाच्या पदासाठी विस्तृत खप असलेल्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन, आणि तसेच ती जाहिरात परिषदेच्या सूचनाफलकावर रोजगार समाचारपत्रात प्रदर्शित करुन अर्ज मागवील.

(२) परिषद ज्या उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज केला असेल त्या सर्व पात्र उमेदवारांचे अर्ज विचारात घेईल.

४०. परिषदेचा इतर कर्मचारी वर्ग:-

परिषद, पुढीलप्रमाणे परिषदेच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करील :-

(क) उप-प्रबंधक – परिषदेस पुढील शर्तींवर उप प्रबंधकाची नियुक्ती करता येईल :-

उप प्रबंधकाचे पद हे, स्थायी असेल. उप प्रबंधक हा परिषदेचा पूर्णकालिक अधिकारी असेल आणि तो, परिषदेच्या कामाशी संबंधित नसेल असे इतर कोणतेही काम करणार नाही. कोणत्याही व्यक्तीची उप प्रबंधक पदाच्या निर्बाध पदावर प्रथमत: नियुक्ती झाल्यावर ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.

(ख) उप प्रबंधक पदावरील नियुक्तीस पात्र होण्यासाठी उमेदवाराने,-

(एक) कायद्याद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठाची पदवी धारण केलेली असावी; आणि

(दोन) मराठी विषयासह माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी;

परंतु, परिषदेस निर्धारित केलेली असेल अशा कालावधीसाठी उप प्रबंधकाच्या पदावर कोणत्याही सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल.

(ग) उप प्रबधंकास राज्य शासनाच्या समतुल्य वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्याला जो दर अनुज्ञेय असेल त्या दराने रु.९३००-३४८०० अधीक ग्रेड वेतन रु ४२०० या वेतनश्रेणीतील वेतन, महागाई भत्ता, प्रवास भत्ता, शहर पूरक भत्ता, घरभाडे भत्ता अनुज्ञेय राहील.

(घ) उप प्रबंधकाच्या पदावरील सेवा प्रवेशासाठीची वयोमर्यादा हे, राज्य शासनाचे समतुल्य पदधारण करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत लागू असलेल्या वर्यामर्यादेइतकी, असेल.

(ड) साधारणत: उप प्रबंधकाचे सेवा निवृत्तीचे वय हे, राज्य शासनाच्या बाबतीत लागू असलेल्या कर्मचाऱ्याच्या वयाइतकेच असेल.

(ख) **लिपिकीय कर्मचारीवर्ग आणि चपराशी :-**

परिषद पुढील शर्तींवर तिच्या कर्मचारी वर्गाची नियुक्ती करील:-

(क) लिपिकीय व चपराशी पदांची संख्या ही, शासन मंजूर करील त्याप्रमाणे असेल. ही पदे स्थायी स्वरुपाची असतील आणि त्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती हया, परिषदेचे पूर्णकालिक कर्मचारी असतील आणि त्या व्यक्ती परिषदेच्या कामाशी संबंधित नसेल असे इतर कोणतेही काम करणार नाहीत. या पदांवर नियुक्तीसाठीची अर्हता, ही राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याच्या तत्सम संवर्गातील पदांवर नियुक्ती करण्यासाठीच्या अर्हतेविषयक निकषांप्रमाणे असेल.

(ख) परिषदेचे सर्व कर्मचारी हे, राज्य शासनाच्या तत्सम श्रेणीतील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असतील अशा वेतनश्रेणी आणि भत्ते मिळण्यास पात्र असतील आणि ते, वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल त्याप्रमाणे, राज्य संवर्गातील तत्सम श्रेणींची सुधारित वेतनश्रेणी मिळण्यासदेखील हक्कदार असतील.

(ग) साधारणत: ही पदे धारण करणाऱ्या व्यक्तींच्या सेवानिवृत्तीचे वय हे, राज्य शासनाच्या समतुल्य संवर्गाच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू असलेल्या वयाप्रमाणेच असेल.

(घ) निवडीची पध्दत : परिषद, अधिकारी, लिपिक व चपराशी या पदांसाठी विस्तृत खप असलेल्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, आणि तसेच ती जाहिरात परिषदेच्या आणि निवड करण्याच्या प्रयोजनार्थ उमेदवारांची नावे सूचविण्यासाठी सेवायोजन कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करुन अर्ज मागवील.

(२) निवडीची पध्दत - परिषद ज्या उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज केला असेल त्या सर्व पात्र उमेदवारांचे अर्ज विचारात घेईल. परिषदेचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी हा परिषदेच्या पूर्व परवानगीशिवाय परिषदेच्या कामाशी संबंधित नसेल असे कोणतेही काम स्वत:हून करणार नाही.

४१. उपस्थिती :

(१) प्रबंधक आणि परिषदेचे इतर कर्मचारी हे, राज्य शासनाने बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयांसाठी विहित केलेल्या वेळेत आणि जेव्हा आवश्यक वाटेल अशा इतर वेळी कार्यालयात उपस्थित राहतील.

(२) अध्यक्षाच्या परवानगीशिवाय प्रबंधक स्वत:हून कर्तव्यावर अनुपस्थित राहणार नाही. परिषदेचे इतर कर्मचारी हे प्रबंधकाच्या परवानगीशिवाय त्यांच्या कर्तव्यावर अनुपस्थित राहणार नाहीत.

४२. रजा:

(१) हक्क म्हणून रजेचा दावा करता येऊ शकणार नाही. उपप्रबंधक, लिपिकीय कर्मचारी वर्ग आणि चपराशी यांची रजा प्रबंधक मंजूर करील. कोणत्याही वर्णनाची रजा नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा स्वेच्छाधिकार हा रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे राखून ठेवण्यात आला आहे.

(२) नैमित्तिक रजा ही विशेष व अकल्पित परिस्थितीसाठी देता येईल आणि एका वर्षात नैमित्तिक रजांचा एकूण कालावधी हा आठ दिवस इतक्या मर्यादेचा असेल. नैमित्तिक रजा ही, रजा मंजूर करणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगीने रविवार आणि सुट्ट्यांच्या मागे किंवा पुढे जोडून घेता येईल.

(३) प्रबंधक, उपप्रबंधक यांस आणि परिषदेच्या प्रत्येक कर्मचाऱ्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ यांच्या तरतुदीनुसार रजा मंजूर करण्यात येईल.

४३. राजीनामा

(१) प्रबंधकास तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर परिषदेची नोकरी सोडता येईल, जर तो नोटीस न देता नोकरी सोडत असल्यास, एका महिन्याचे मुळ वेतन भरावे लागेल.

(२) परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास, जर तो तात्पुरत्या कर्मचारी असेल तर एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर आणि कायमस्वरूपी कर्मचारी असेल तर, तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर नोकरी सोडता येईल जर त्याने अशा प्रकारे आवश्यक नोटीस देण्यात कसूर केली तर, नोटीस कालावधीसाठीचे त्याचे वेतन त्याला समापहृत करावे लागेल.

४४. सेवा समाप्ती

(१) परिषदेत प्रबंधकाखेरीज कोणत्याही कर्मचाऱ्याची सेवा त्या कर्मचाऱ्याची रीतसर चौकशी केल्यानंतर, सेवा का समाप्त करण्यात येऊ नये, याबाबत त्याला स्पष्टीकरण देण्यासाठी उचित संधी देऊन समाप्त करता येईल. परिषदेस प्रबंधकाखेरीज अन्य कोणत्याही कर्मचाऱ्यावर, अशा कर्मचाऱ्याला कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर अन्य कोणतीही किरकोळ शास्ती देखील लादता येईल :

परंतु, परिषदेच्या ज्या कर्मचाऱ्याची नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या तत्वावर करण्यात आलेली आहे आणि त्याची सेवा कोणतीही नोटीस न देता आणि कोणतेही कारण न देता समाप्त करण्यास तो पात्र आहे, असे हमीपत्र ज्याने दिलेले आहे अशा कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करणे हे परिषदेसाठी कायदेशीर असेल.

(२) प्रबंधकाखेरीज अन्य कोणत्याही कर्मचाऱ्याने गंभीर स्वरूपाची कसूर केली असेल तर त्या बाबतीत, अध्यक्षास परिपूर्ण चौकशी करण्यात येईपर्यंत अशा कर्मचाऱ्यास निलंबित करता येईल. निलंबन कालावधीमध्ये अशा कर्मचाऱ्यास, किंवा प्रबंधकास कलम १३ चे पोट-कलम (४) च्या तरतुदी अनुसार प्रबंधकास निलंबित करण्यात आले असल्यास, त्या प्रबंधकास शासनाच्या परवानगीने परिषद ठरवील त्याप्रामणे निर्वाह भत्ता देण्यात येईल.

४५. उपदान:

परिषदेचा कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास, किंवा त्याने राजीनामा दिल्यास, परिषद अशा कर्मचाऱ्याला, किंवा कर्मचाऱ्याचा सेवेत असताना मृत्यु झाला असेल तर त्या बाबतीत त्याच्या कुटुंबाला, शासनाच्या समतुल्य संवर्गाच्या कर्मचाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या उपदानाच्या रकमे एवढी रक्कम, उपदान म्हणून देईल.

परंतु, त्या कर्मचाऱ्याची परिषदेमध्ये किमान पाच वर्षांची सलग सेवा झाली असल्याखेरीज अशी रक्कम देण्यात येणार नाही.

४६. प्रबंधकाची कर्तव्ये:

(१) प्रबंधकाचे कार्यालयाच्या व्यवस्थापनावर सर्वसाधारण नियंत्रण असेल. इतर सर्व कर्मचारी थेट प्रत्यक्षपणे प्रबंधकाच्या अधीन असतील, तो त्यांना त्यांची कर्तव्ये नेमून देईल.

(२) प्रबंधक अधिनियमाच्या व या नियमांच्या तरतुदी अनुसार नोंदवह्या ठेवील. प्रबंधक परिषदेच्या प्रत्येक बैठकीस आणि परिषदेच्या इतर समित्यांच्या बैठकींना उपस्थित राहील आणि अशा बैठकींचे कार्यवृत्त घेईल.

(३) प्रबंधक, परिषदेचा सचिव म्हणून परिषदेचा पत्रव्यवहार पाहील आणि त्याच्याकडे याचा प्रभार असेल आणि या नियमांन्वये आवश्यक रीतीने आवश्यक त्या सर्व नोटीसा काढील.

४७. लेखा पुस्तके आणि इतर नोंद वह्या ठवणेः

प्रबंधक पुढील पुस्तके व नोंदवह्या ठेवील:

१. रोकडवही;
२. खातेवाही;
३. टपाल अंतर्भूत असलेली आवक आणि जावक खातेवही;
४. अविक्रेय माल नोंदवही;
५. मुद्रीत प्रमाणपत्रासाठी संग्रह नोंदवही;
६. पावती पुस्तक;
७. प्रमाणक फाईल;
८. हजेरी पट;
९. रजा खाते नोंदवही;
१०. परिषदेच्या भविष्यनिर्वाह निधीसाठी आवश्यक नोंदवह्या;
११. सेवा पुस्तक; आणि
१२. आवश्यक असतील अशा इतर नोंदवह्या.

प्रकरण सहा

लेखे

४८. बँकेत खाते उघडणे

भारतीय स्टेट बँकेमध्ये किंवा मुंबईतील कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये परिषदेच्या नावाने खाते उघडण्यात येईल आणि परिषदेचे सर्व पैसे त्या बँकेत जमा करण्यात येतील. प्रबंधक आणि अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा त्यांच्यापैकी कोणीही एक ते खाते चालवतील.

४९. पैसे मिळाल्याची पावती

प्रबंधक परिषदेला देय असलेले सर्व पैसे स्वीकारील किंवा स्वीकारण्याची व्यवस्था करील. तो दोन हजार रूपयांपेक्षा अधिक रक्कम त्याच्या हातात किंवा पैसे स्वीकारण्यासाठी त्याने प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्याच्या हातात ठेवणार नाही किंवा ठेवण्याची व्यवस्था कारणार नाही. उर्वरित रक्कम बँकेमध्ये परिषदेच्या नावे जमा करण्यात येईल.

५०. उत्पन्न आणि खर्च यांचे वार्षिक विवरणपत्र

प्रबंधक प्रत्येक वर्षाच्या जुलै महिन्यात मागील वित्तीय वर्षाचे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र तयार करील आणि नोटीस काढण्याजोगे आहेत अशा परिषदेचे लक्ष वेधील.

५१. वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षा

कार्यकारी समितीच्या निर्देशनाखाली प्रबंधक वार्षिक लेखे तयार करील ते प्रत्येक वित्तीय वर्ष समाप्ती झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांच्याकडून लेखापरिक्षेत करण्यात येतील.

५२. महसूल आणि खर्चाचे अंदाजपत्रक

(१) प्रत्येक वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यामध्ये त्यानंतरच्या आगामी दि.०१ एप्रिल रोजी सुरू होणाऱ्या वर्षासाठी परिषदेच्या महसुलाचे आणि खर्चाचे अंदाजपत्रक परिषदेपुढे ठेवण्यात येईल.

(२) अशा अंदाजपत्रकामध्ये, परिषदेच्या दायित्वाच्या परिपूर्तीसाठी आणि ती उद्दीष्टे प्रभावतीरितीने पार पाडण्यासाठी तरतुद करण्यात येईल. त्या अंदाजपत्रकामध्ये, सर्वसाधारणपणे अपेक्षित सर्व महसूल, नोंदणी आणि इतर स्त्रोतांमधून प्राप्त झालेली सर्व शुल्क यांशिवाय, त्याचा सर्व महसुली भाग समाविष्ट असेल.

(३) परिषद अशारतीने तिला सादर केलेले अंदाजपत्रक विचारात घेईल आणि त्यास योग्य वाटेल त्यामध्ये फेरबदल न करता ते मंजूर करील किंवा अशा फेरबदलांच्या अधीन राहून ते मंजूर करील.

५३. पूरक अंदाजपत्रक

परिषदेस ज्या वर्षासाठी कोणतेही अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले असेल, त्या वर्षाच्या कोणत्याही वेळी पूरक अंदाजपत्रक तयार करून घेण्याची व ते परिषदेला सादर करण्याची व्यवस्था करता येईल. असे प्रत्येक पूरक अंदाजपत्रक हे जणुकाही ते मूळ वार्षिक अंदाजपत्रक आहे असे समजून परिषदेद्वारे ते विचारात घेईल आणि मंजूर करील. अर्थसंकल्पात किंवा पूरक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात ज्याची यथोचितरीत्या तरतूद केली नसेल असा कोणताही खर्च परिषदेकडून करण्यात येणार नाही.

५४. दाव्यांची छाननी

पैशाची मागणी करण्याकरिता म्हणून सादर केलेले देयक किंवा प्रमाणक प्रबंधकाकडून स्वीकारण्यात येईल आणि त्याचे परीक्षण करण्यात येईल. जर दावा केला आहे ती रक्कम एक हजार रूपयांपेक्षा जास्त नसेल आणि देयक उचित असेल तर प्रबंधक ती रक्कम प्रदान करील जर दावा केली आहे ती रक्कम एक हजार रूपयांपेक्षा जास्त असेल परंतु दोन हजार रूपयांपेक्षा नसेल तर, अध्यक्षाने दावा मंजूर करेपर्यंत रक्कम प्रदान करण्यात येणार नाही. जर दोन हजार रूपयांपेक्षा अधिक रकमेसाठी दावा करण्यात आला असेल तर, समितीने त्याचे परीक्षण करेपर्यंत आणि तो संमत करेपर्यंत रक्कम देण्यात येणार नाही.

५५. प्राप्त केलेल्या किंवा खर्च केलेल्या सर्व रकमांचे लेखांकन

प्रबंधक परिषदेने प्राप्त केलेल्या किंवा खर्च केलेल्या सर्व पैशांची रोकडवहीच्या लेखात तात्काळ नोंद करील.

५६. देणग्या

परिषदेला खाजगी व्यक्तींकडून आणि संस्थांकडून तिच्या खर्चाच्या प्रयोजनांसाठी देणग्या, धर्मदान आणि वर्गण्या तसेच अहवाल आणि इतर प्रकाशनांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न याच्या प्रयोजनासाठी देणगी प्राप्त करण्याकरिता प्राधिकृत केलेले आहे.

भाग - ७

५७. नोंदणीचा नमुना

(१) प्रबंधक नमुना सहा मध्ये ॲक्युपंक्चर व्यावसायी आणि ॲक्युपंक्चर कर्मचारी यांची नोंदवही ठेवील. प्रबंधक, अनुक्रमे ॲक्युपंक्चर व्यवसायींची नावे आणि इतर माहिती समाविष्ट असणारा भाग-क, भाग-ख ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्यांची नावे आणि इतर माहिती समाविष्ट असणारा भाग-ग अशा तीन भागांमध्ये विभागण्यात येईल.

(२) (क) कलम-२० च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, नोंदवहीच्या भाग-क मध्ये तिच्या नावाची नोंद केली जाण्यास हक्कदार असेल.

(ख) कलम-२० च्या पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले अर्हता धारण किंवा ॲक्युपंक्चर व्यवसायी म्हणून नोंदणी करण्याकरिता परिषदेने घेतलेल्या किंवा घ्यावयाची व्यवस्था केलेल्या पात्रता चाचणीमध्ये अर्हता प्राप्त असणारी प्रत्येक व्यक्ती, नोंदवहीच्या भाग-ख मध्ये तिच्या नावाची नोंद केली जाण्यास हक्कदार असेल.

(ग) ॲक्युपंक्चर कर्मचारी म्हणून नोंदणीसाठी परिषदेने घेतलेल्या किंवा घ्यावयाची व्यवस्था केलेल्या पात्रता चाचणीमध्ये अर्हता प्राप्त केली असेल अशी, किंवा परिषदेकडून देण्यात आलेली ॲक्युपंक्चरची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण केलेली असेल अशी प्रत्येक व्यक्ती, नोंदवहीच्या भाग-ग मध्ये तिचे नाव नोंदले जाण्यास हक्कदार असेल.

५८. नोंदणीसाठी अर्ज

संगणकीय पद्धतीने (Online) नोंदणीची प्रक्रिया परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल नोंदणीसाठीचा अर्ज नमुना सात मध्ये असेल. अर्जदार संगणकीय पद्धतीने (Online) भरलेल्या अर्जाच्या छापील प्रती सोबत अलीकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, संपादन केलेले ॲक्युपंक्चर अर्हतेचे प्रमाणपत्र आणि उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र तसेच शाळा सोडल्याचा दाखला किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला सादर करील. अर्जदाराने छायाचित्र दाखविण्याच्या बाबतीत, अर्जदाराने ॲक्युपंक्चर पाठ्यक्रम ज्या संस्थेतून पूर्ण केलेला असेल त्या संस्थेच्या प्राचार्याकडून किंवा कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडून योग्यरीत्या साक्षांकित केलेले असावे आणि ते अर्जासोबत जोडण्यात यावे.

५९. अर्हतेची पडताळणी

(१) प्रबंधक मूळ प्रमाणपत्रे तपासल्यावर साक्षांकित प्रमाणपत्रांच्या अधिप्रमाणता पडताळून पाहील आणि नोंदणीचा अर्ज दाखल करून घेईल.

(२) प्रबंधक ज्या विद्यापीठाने किंवा परीक्षामंडळाने अर्जदाराला अर्हता प्रदान केली असेल त्या संबंधित विद्यापीठ किंवा परीक्षा मंडळाला अर्हता प्रमाणपत्राच्या पडताळणीबाबत लेखी माहिती देईल.

(३) संबंधित विद्यापीठाकडून किंवा परीक्षा मंडळाकडून प्राप्त झालेल्या अहवालावरून जर अर्जदाराने सादर केलेले अर्हता प्रमाणपत्र खोटे आहे असे उघडकीस आले तर अशा बाबतीत, प्रबंधक त्या व्यक्ती विरोधात आवश्यक कार्यवाही करण्यासाठी संबंधित पोलीस प्राधिकरणांना कळवील.

६०. नोंदणी फी आणि पडताळणी फी

(१) ॲक्युपंक्चर व्यवसायीला पहिल्यावेळी नोंदवहीमध्ये त्याचे नाव नोंदविण्यासाठी सात हजार रूपये एवढी नोंदणी फी आणि तीन हजार रूपये एवढी पडताळणी फी भरावी लागेल.

(२) ॲक्युपंक्चर कर्मचारी म्हणून तिची स्वतःची नोंदणी करण्यास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस पाचशे रूपये इतकी नोंदणी फी भरावी लागेल.

६१. नोंदणी प्रमाणपत्र

(१) अधिनियमाच्या कलम-२० च्या पोट कलम (३) अन्वये नोंदणी करण्यास पात्र असलेल्या प्रत्येक ॲक्युपंक्चर व्यवसायीला अधिनियमाच्या कलम २० च्या पोट कलम (४) अन्वये द्यावयाचे नोंदणी प्रमाणपत्र हे नमुना **आठ** मध्ये असेल.

(२) अधिनियमाच्या कलम-२० च्या पोट-कलम (५) अन्वये नोंदणी करण्यास पात्र असलेल्या ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्याला द्यावयाचे नोंदणी प्रमाणपत्र नमुना आठ मध्ये असेल.

(३) नोंदणी प्रमाणपत्र पाच वर्षांकरिता वैध असेल.

६२. दुबार नोंदणी प्रमाणपत्र

या नियमाच्या अंतर्गत देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र गहाळ झाल्यास अथवा नष्ट झाल्यास, धारकाला असे प्रमाणपत्र अंमलात असणाच्या कालावधीत कोणत्याही वेळी नवीन प्रमाणपत्रासाठी प्रबंधकाकडे अर्ज करता येईल आणि प्रबंधक त्याला जर अर्जदाराच्या ओळखीबाबतचा समाधानकारक पुरावा योग्य वाटत असेल तर म्हणजेच नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायीचे किंवा ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्याचे छायाचित्र आणि कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमक्ष केलेले शपथपत्र आणि संबंधित पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीची प्रत प्रमाणित केल्यानंतर रूपये एक हजार इतकी फी प्रदान केल्यावर दुबार प्रमाणपत्र देईल. या उप नियमाअंतर्गत देण्यात आलेल्या प्रमाणपत्रावर उजव्या कोपऱ्यात 'दुबार' असे लिहिण्यात येईल. परिषदेला एक हजार रूपये फी संगणकाद्वारे (Online) प्रदान केली जाईल.

६३. ओळखपत्र

प्रबंधक त्याच्या सहीने प्रत्येक नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायीला किंवा ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्याना नमुना नऊ मधील ओळखपत्र देईल.

६४. नोंदणीचे नुतनीकरण

(१) ज्याने नोंदणी प्रमाणपत्र धारण केले आहे असा प्रत्येक नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी नोंदणीच्या नुतनीकरणासाठी नोंदणीचा दिनांक समाप्त होण्याच्या तीन महिने आधी, रूपये पाचशे फक्त इतक्या नुतनीकरण नमुना दहा मध्ये नुतनीकरणासाठी अर्ज करील.

(२) जो वर निर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत त्याच्या नोंदणीचे नुतनीकरण करण्यात कसूर करील असा नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी नोंदणी नुतनीकरणाच्या दिनांकापर्यंत प्रत्येक महिन्यासाठी एक हजार रूपये फक्त इतक्या विलंब फी नमुना १० मध्ये अर्ज करील.

(३) नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी, परिषदेकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येतील अशा प्रमाणात (ॲक्युपंक्चरमधील निरंतर वैद्यकीय शिक्षणानुसार) श्रेयांक तास प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र जोपर्यंत सादर करीत नाही तोपर्यंत, नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण केले जाणार नाही.

६५. अतिरिक्त अर्हता

(१) अतिरिक्त अर्हतेच्या नोंदणीसाठी नमुना अकरा मध्ये अर्ज करण्यात येईल. परिषदेच्या मान्यतेनंतर, अर्जदार संगणकाद्वारे (Online) दोन हजार रूपये एवढी फी भरील आणि मागणी केलेल्या अर्हतेच्या कागदपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती त्यासोबत जोडील.

(२) उप-नियम (१) अन्वये अतिरिक्त अर्हतेची नोंदणी केल्यावर, प्रबंधक नमुना १२ मधील अशा आशयाचे एक प्रमाणपत्र देईल.

६६. नोंदवहीतील नोंदीच्या प्रमाणित प्रती

नोंदवहीत अंतर्भुत असलेल्या नोंदीच्या प्रमाणित प्रती ह्या, त्यांच्यासाठी अर्ज केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, प्रत्येक नोंदीकरिता रूपये पाचशे भरल्यानंतर दिल्या जातील.

६७. नावात बदल

नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारीच्या नावात बदल करण्यासाठी स्वत: एक अर्ज करील आणि त्यासोबत रूपये एक हजार एवढी फी भरील आणि दंडाधिकाऱ्याच्या समक्ष शपथबध्द केलेले ज्यात अर्जदार हा तीच व्यती जिचे नाव विशिष्ट क्रमांकासह नोंदणीकृत केलेले आहे आणि ज्या कारणासाठी बदलाची मागणी करण्यात आली आहे ते कारणही तेच आहे अशा आशयाचे शपथपत्रदेखील सोबत जोडण्यात आले आहे. विवाहानंतर नावात बदल करण्याच्या बाबतीत अर्जदार विवाह प्रमाणपत्राच्या किंवा शपथपत्राच्या किंवा शासकीय राजपत्राच्या प्रतीसह अर्ज सादर करील

६८. पत्त्यामधील बदल

ज्याने पत्ता बदलला असेल अशा प्रत्येक ॲक्युपंक्चर व्यवसायीने किंवा ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्यांने अशा बदली बाबत तो केल्यापासून एका महिन्याच्या आत त्याचे कर्तव्य असेल. एखाद्या नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायीने किंवा ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्याने पत्त्यातील बदलाबाबत कळविण्यात कसूर केल्यास त्याबाबत रुपये पाचशे एवढी फी भरल्यावर पत्त्यावरील बदल नोंदवहीमध्ये नोंदविण्यात येईल.

प्रकरण आठ

चौकशी

६९. नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी यांचे विरूद्ध तक्रारी

(१) परिषदेस, अधिनियमाच्या कलम-२२ च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी यांच्या अभिकथित गैरवर्तणुकीबाबत स्वाधिकारे किंवा त्याबाबत कोणतीही तक्रार करण्यात आल्यास, त्या तक्रारीवरून चौकशी करता येईल.

(२) अभिकथीत गैरवर्तणूकीबाबत परिषदेच्या कार्यालयात व्यवसायी व कर्मचारी यांच्या विरुद्ध कोणतीही तक्रार किंवा माहिती प्राप्त झाल्यास, प्रबंधक ती अध्यक्षाकडे सादर करील.

(३) कोणतीही तक्रार लेखी स्वरुपात, परिषदेला उद्देशून असल्याशिवाय, आणि ती तक्रार करणाऱ्या व्यक्तीची तक्रार अर्जावर स्वाक्षरी असल्याशिवाय अशी तक्रार विचारार्थ दाखल करून घेतली जाणार नाही आणि त्यामध्ये त्या तक्रारीची कारणे नमूद केलेली असावीत आणि त्यासोबत प्रकरणाच्या तथ्यांबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडलेले असावे. निनावी सर्व स्वरूपाच्या तक्रारी दुर्लक्षित करण्यात येतील.

(४) प्रत्येक घोषणापत्रामध्ये, घोषणाकर्त्यांच्या वस्तीस्थानाचे वर्णन व खऱ्या ठिकाणाबाबतची माहिती, नमूद केलेली असेल आणि प्रतिज्ञापत्रात नमूद केलेले तथ्य त्यांच्या वैयक्तिक माहितीनुसार असेल तर, माहितीचा स्त्रोत आणि घोषणाकर्त्यांच्या समजुतीची, तिच्या सत्यतेसह कारणे, अचूकपणे व पूर्णपणे नमूद करण्यात येतील या नियमांचे उल्लंघन करून केलेले कोणतेही घोषणापत्र किंवा त्याचा भाग पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.

(५) जर तक्रार खोट्या नावाने केलेली आहे असे मानण्यास अध्यक्षांकडे संयुक्तिक कारण असेल तर तक्रार खरी आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी, तो तक्रारकर्त्यास आणखी तपशील देण्यासाठी फर्मावू शकेल.

७०. समितीकडे तक्रार सादर करण्याची कार्यपध्दती

(१) नियम-६९ च्या तरतुदींच्या अधीन राहून अध्यक्ष हा तक्रारीचे अवलोकन करताना आणि तक्रार कर्त्याद्वारे सादर केलेली सर्व कागदपत्रे तक्रारीसह ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी नोंदणीकृत पत्राच्या साधनाद्वारे तो जे मागवेल असे कोणतेही स्पष्टीकरण मागविण्यासाठी प्रबंधकाला सूचना देईल.

(२) तक्रारीशी संबंधित नोंदणीकृत व्यवसायी व कर्मचाऱ्याने पुढे पाठविलेल्या कोणत्याही स्पष्टीकरणासह सर्व कागदपत्रे जर काही असल्यास, अध्यक्षांच्या अभिप्रायासह कार्यकारी समितीकडे निर्दिष्ट केले जातील

७१. परिषदेकडे तक्रार पाठविण्याबाबतचे कार्यकारी समितीचे अधिकार

(१) कार्यकारी समिती तक्रार विचारात घेईल आणि आणखी अन्वेषण करवून घेता येऊ शकेल आणि त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही विधि सहायकाशी सल्लामसलत करून विधी सल्ला घेऊ शकेल.

(२) जर प्रकरणाचा प्रथमदर्शनी उलगडा होत नसेल आणि म्हणुन ते प्रकरण दाखल करुन घेतले पाहिजे किंवा परिस्थितीवरुन ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्यूपंक्चर कर्मचारी प्रकरण परत्वे यांना ताकीद देणे पुरेसे ठरेल असे सुचित होत असेल किंवा ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांचे नाव नोंदवहीतून निरसित करावयास हवे असे ते प्रकरण आहे, असे कार्यकारी समितीचे मत झाले असेल तर,समिती त्यानुसार तिचे निष्कर्ष नोंदवील. तसेच, परिषदेकडून त्या प्रकरणाची सुनावणी आणि निर्णय करण्याबाबतचे उपाय योजण्याचे प्रबंधकाला निदेश देईल.

७२. प्रकरण परिषदेकडे विचारार्थ पाठविण्याची कार्यपध्दती

(१) जेथे कार्यकारी समितीचे असे मत आहे की, प्रकरण हे फाईल केले पाहिजे आणि एक इशारा देणे पुरेसे असेल तेथे कार्यकारी समितीने नोंदणीकृत टपालाने पाठविलेल्या पत्राद्वारे, पत्राच्या पोच दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत जर काही असल्यास, नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी यांना प्रकरण परत्वे यांच्या स्पष्टीकरणासाठी प्रबंधकाने बोलावणे आवश्यक असू शकेल.

(२) उप-नियम (१) मध्ये निर्देशिलेली वेळेची मर्यादा संपल्यानंतर, प्रकरणाची स्पष्टीकरणासह सर्व कागदपत्रे जर काही नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी प्रकरण परत्वे यांच्या परिषदेकडे निर्देशित करण्यात येतील.

(३) परिषद उप-नियम (२) अंतर्गत कागदपत्र प्राप्त झाल्यावर विचारात घेईल आणि

(क) कागदपत्रे फाईल करणे,

(ख) नोदंणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी प्रकरण परत्वे वरील दोषारोपातून मुक्त करणे किंवा;

(ग) नियम ६९ ते ८१ मध्ये निर्धारित केल्यानुसार निर्देश देणे व चौकशी करणे ठरवील.

७३. ज्या प्रकरणांत परिषदेने चौकशी आयोजित केली आहे त्या प्रकरणी न्याय सहायक नेमण्याचा परिषदेचा अधिकार

(१) कलम-२२ च्या प्रयोजनार्थ अशा सर्व प्रकरणांमध्ये चौकशी करणे आवश्यक असेल तर, परिषदेद्वारा नियम-६९ ते ८१ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार चौकशी आयोजित केली जाईल; आणि त्या प्रयोजनाकरिता परिषद, अधिनियमाच्या कलम-२२ च्या पोट-कलम (५) च्या तरतुदींनुसार तिला सल्ला देण्यासाठी न्याय सहायकाची नियुक्ती करेल.

परंतु असे की, अशा प्रकरणांत जेथे एखाद्या नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी प्रकरण परत्वे यांच्या वर त्याच्या गैरवर्तणूकीबाबत सक्षम न्यायालयाने सिध्दापराध ठरवलेला असेल तर अशा चौकशीची आवश्यकता असणार नाही. अशा प्रकरणांमध्ये अध्यक्ष न्यायालयाच्या न्यायनिर्णयाची प्रत प्राप्त करील आणि त्यानंतर परिषद अधिनियमाच्या कलम-२२ अंतर्गत नोंदणी नाकारणे किंवा काढून टाकणे याबाबत ठरवेल.

(२) नियुक्त केलेल्या न्याय सहायकाला परिश्रमिक म्हणून प्रत्येक दिवशी दोन हजार रूपये चौकशीला उपस्थित राहण्यासाठी देण्यात येतील.

७४. नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी प्रकरण परत्वे यांच्यावरील दोषारोपांची नोटीस.

(१) अध्यक्ष हा नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी प्रकरण परत्वे यांच्या नोटीस बजावील. अशी नोटीस दोषारोपाचे स्वरूप व तपशील विनिर्दिष्ट करणारी असेल आणि कोणत्या दिवशी परिषद प्रकरण हाताळू इच्छिते हे त्यास कळविल, आणि ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्याला प्रकरण परत्वे त्याने त्याच्या बचावार्थ पंधरा दिवसांच्या आत किंवा तीस दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीच्या आत जशी परिषदेने परवानगी दिली असेल त्याप्रमाणे लेखी निवेदन सादर करावे आणि अशा दिवशी परिषदेसमोर उपस्थित राहावे याचा आदेश देईल.

(३) संबंधित कागदपत्रांच्या प्रती, असल्यास, (परिषदेद्वारा किंवा इतर पक्षकाराच्या वतीने दिलेल्या किंवा पाठविलेल्या कागदपत्रांसह, पुराव्याच्या पृष्ठार्थ सुनावणीच्या वेळी जो इतर असा पक्षकार हक्कदार असेल किंवा चौकशीच्या नोटीसमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दोषारोपाला उत्तर देईल) प्रकरण परत्वे नोंदणीकृत ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचारी, यांना नोटीस व अभिकथनाच्या विवरणासह पुरविण्यात येईल.

(४) त्याच्या संरक्षणाची तयारी करणाऱ्या अशा ॲक्युपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्युपंक्चर कर्मचाऱ्यास प्रकरण परत्वे कोणत्याही इतर दस्तऐवज किंवा निवेदनाच्या प्रती त्याला त्याच्या संरक्षणाची तयारी यासाठी पुरविल्या जातील किंवा त्याच्या प्रती घेण्यास परवानगी असेल.

७५. नोटीशीला उत्तर देणे

